**1. मूल्यांककांच्या यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठीचे निकष**

**यादीमध्ये समाविष्ट असलेले मूल्यांकक खालीलप्रमाणे विविध प्रकारच्या मालमत्तांचे मूल्यांकन करतील :-**

(i) जमीन व इमारत
(ii) संयंत्रे व यंत्रसामग्री
(iii) मालाचे साठे आणि समभाग खरेदी-विक्री व्यवहार
(iv) शेतजमीन

**A) <u>शैक्षणिक अर्हता आणि कामाचा पूर्वानुभव:-</u>**

**I] <u>जमीन व इमारत/स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन:-</u>**

दि. 01.01.2020 पासून **फक्त** जमीन व इमारत/स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन करण्याची पात्रता असलेल्या **शैक्षणिक अर्हताप्राप्त मूल्यांककांनाच** मूल्यांककांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जाईल.

(a) स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाची, म्हणजेच राज्य किंवा केंद्रीय कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी, तसेच स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामध्ये 2 वर्षांचा अनुभव.

(b) भारत सरकारद्वारा उच्चस्तरीय सेवा वा पदांकरता मान्यता दिलेल्या कुठल्याही संस्थेद्वारे घेतली जाणारी स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनाची परीक्षा उत्तीर्ण आणि स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामध्ये 2 वर्षांचा अनुभव

**दि. 01.01.2016 ते 31.12.2019 साठी जमीन व इमारत/स्थावर मालमत्तेच्या मूल्यांककांच्या यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरता आवश्यक शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे असेल:**

| **अ. क्र.** | **शैक्षणिक पात्रता** | **अनुभव** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 01. | स्थापत्य अभियांत्रिकी/ वास्तुविद्या / नगर नियोजन यांमधील पदवी किंवा तत्सम पात्रता | पदवी वा तत्सम पात्रता पूर्ण केल्यानंतर स्थावर मालमत्ता मूल्यांकनाच्या क्षेत्रामध्ये 5 वर्षांचा अनुभव | (a) **60 वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या अर्जदारांकरता:** सदर पात्रता असलेल्या आणि दि. 01.01.2016 रोजी वयाची 60 वर्षे पूर्ण न केलेल्या अर्जदारांना, स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन करण्याकरता महत्त्वाच्या असलेल्या पण स्थापत्य अभियांत्रिकी /वास्तुविद्या / नगर नियोजनाच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट नसलेल्या विषयांमध्ये एक सेमिस्टर एवढा कालावधी असलेली आणि मान्यताप्राप्त विद्यापीठे/ भारत सरकारद्वारा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उच्चस्तरीय सेवा वा पदांच्या भरतीकरता मान्यता देण्यात आलेली संस्था घेत असलेली स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामधील परीक्षादेखील दि. 31.12.2019 पूर्वी उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.<br><br>**(b) वयाची 60 वर्षे पूर्ण केलेल्या व त्यापुढील वयाच्या अर्जदारांकरताः**<br>सदर पात्रता असलेल्या आणि दि. 01.01.2016 रोजी वयाची 60 वर्षे पूर्ण केलेल्या अर्जदारांना, मान्यताप्राप्त विद्यापीठे/ भारत सरकारद्वारा उच्चस्तरीय सेवा वा पदांच्या भरतीकरता मान्यता देण्यात आलेली संस्था चालवत असलेला स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामधील दोन आठवड्यांचा प्रशिक्षण कार्यक्रमदेखील दि. 31.12.2019 पूर्वी पूर्ण करणे आवश्यक असेल.<br>**टीप: वरील अ. क्र. 1 (a व b) मध्ये निर्देशित केलेल्या निकषांच्या आधारे यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले अर्जदार दि. 1.1.2020 नंतरदेखील यादीमध्ये समाविष्ट करण्यास पात्र ठरतील.** |
| 02. | स्थापत्य अभियांत्रिकी/ वास्तुविद्या यांमधील पदविका | पदविका पूर्ण केल्यानंतर स्थावर मालमत्ता मूल्यांकनाच्या क्षेत्रामध्ये 8 वर्षांचा अनुभव | अर्जदारांनी वरील अ. क्र. 1 मध्ये विहित केलेला स्थावर मालमत्ता मूल्यांकनामधील सहा महिन्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.<br><br>**टीप: वरील अ. क्र. 2 मध्ये निर्देशित केलेल्या निकषांच्या आधारे यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले अर्जदार दि. 1.1.2020 नंतरदेखील यादीमध्ये समाविष्ट करण्यास पात्र ठरतील.** |
| 03. | भारत सरकारद्वारा उच्चस्तरीय सेवा वा पदांच्या भरतीकरता मान्यता देण्यात आलेली स्थावर मालमत्तेच्या | परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर स्थावर मालमत्ता मूल्यांकनाच्या क्षेत्रामध्ये 2 वर्षांचा अनुभव | - |

| | | | |
|---|---|---|---|
| | मूल्यांकनामधील, कुठल्याही संस्थेने घेतलेली परीक्षा उत्तीर्ण | | |
| 04. | भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची, स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामधील पदव्युत्तर पदवी | परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर स्थावर मालमत्ता मूल्यांकनाच्या क्षेत्रामध्ये 2 वर्षांचा अनुभव | - |
| 05. | वरील अ. क्र. 3 व 4 मध्ये नमूद केलेल्या परिक्षांच्या समस्तरीय परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन रॉयल इन्स्टिट्युशन ऑफ चार्टर्ड सर्व्हेयर्स (आरआयसीएस) किंवा अमेरिकन सोसायटी ऑफ अप्रेजर्स (एएसए) किंवा अप्रेजल इन्स्टिट्युट (एआय), यूएसए यांचे सनदी / व्यावसायिक सदस्यत्व | | सदर संस्थांचे सदस्यत्व मिळवण्याच्या प्रक्रियेमध्ये प्रशिक्षण हा एक अंगभूत भाग असल्याने वेगळ्या अनुभवाची आवश्यकता विहित करण्यात आलेली नाही. |

**स्थापत्य अभियांत्रिकी/वास्तुविद्या यांमधील पदविकाधारक फक्त रू. 1 कोटी मूल्यापर्यंतचेच मूल्यांकन करण्याकरता यादीमध्ये समाविष्ट केले जाण्यासाठी पात्र आहेत.**

**II] <u>संयंत्रं आणि यंत्रसामग्रीचे मूल्यांकन:-</u>**

दि. 01.01.2020 पासून फक्त संयंत्रं आणि यंत्रसामग्रीचे मूल्यांकन करण्याकरता खालीलप्रमाणे शिक्षण झालेल्या शैक्षणिक अर्हताप्राप्त मूल्यांकाकांनाच मूल्यांककांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जाईल.

(a) संयंत्रं आणि यंत्रसामग्रीच्या मूल्यांकनामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाची, म्हणजेच राज्य किंवा केंद्रीय कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी, तसेच संयंत्रं आणि यंत्रसामग्रीच्या मूल्यांकनामध्ये 2 वर्षांचा अनुभव.

(b) भारत सरकारने उच्चस्तरीय सेवा वा पदांकरता मान्यता दिलेल्या कुठल्याही संस्थेने घेतलेली संयंत्रं आणि यंत्रसामग्रीच्या मूल्यांकनाची परीक्षा उत्तीर्ण आणि संयंत्रं आणि यंत्रसामग्रीच्या मूल्यांकनामध्ये 2 वर्षांचा अनुभव.

**दि. 01.01.2016 ते 31.12.2019 साठी संयंत्रं आणि यंत्रसामग्रीच्या मूल्यांककांच्या यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरता आवश्यक शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे असेल:**

| **अ. क्र.** | **शैक्षणिक पात्रता** | **अनुभव** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 01. | यांत्रिक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, रासायनिक अभियांत्रिकी, उत्पादन अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी इ. मधील पदवी | पदवी वा तत्सम पात्रता पूर्ण केल्यानंतर संयंत्रं आणि यंत्रसामग्रीच्या मूल्यांकनाच्या क्षेत्रामध्ये 5 वर्षांचा अनुभव | (a) **60 वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या अर्जदारांकरता:**<br>सदर पात्रता असलेल्या आणि दि. 01.01.2016 रोजी वयाची 60 वर्षे पूर्ण न केलेल्या अर्जदारांना, संयंत्रं आणि यंत्रसामग्रीचे मूल्यांकन करण्याकरता महत्त्वाच्या असलेल्या पण वरील अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट नसलेल्या विषयांमध्ये एक सेमिस्टर एवढा कालावधी असलेली आणि मान्यताप्राप्त विद्यापीठे किंवा भारत सरकारद्वारा उच्चस्तरीय सेवा वा पदांच्या भरतीकरता मान्यता देण्यात आलेली संस्था घेत असलेली संयंत्रं आणि यंत्रसामग्रीच्या मूल्यांकनामधील परीक्षादेखील दि. 31.12.2019 पूर्वी उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.<br><br>**(b) वयाची 60 वर्षे पूर्ण केलेल्या व त्यापुढील वयाच्या अर्जदारांकरताः**<br>सदर पात्रता असलेल्या आणि दि. 01.01.2016 रोजी वयाची 60 वर्षे पूर्ण केलेल्या अर्जदारांना, मान्यताप्राप्त विद्यापीठे किंवा भारत सरकारद्वारा उच्चस्तरीय सेवा वा पदांच्या भरतीकरता मान्यता देण्यात आलेली संस्था चालवत असलेला स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामधील दोन आठवड्यांचा प्रशिक्षण कार्यक्रमदेखील (या कार्यक्रमातील विषयांची यादी सोबत जोडली आहे) दि. 31.12.2019 पूर्वी पूर्ण करणे आवश्यक असेल.<br>**टीप: वरील अ. क्र. 1 (a व b) मध्ये निर्देशित केलेल्या निकषांच्या आधारे** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले अर्जदार दि. 1.1.2020 नंतरदेखील यादीमध्ये समाविष्ट करण्यास पात्र ठरतील.** |
| 02. | यांत्रिक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, रासायनिक अभियांत्रिकी, उत्पादन अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी इ. मधील पदविका | पदविका पूर्ण केल्यानंतर स्थावर मालमत्ता मूल्यांकनाच्या क्षेत्रामध्ये 8 वर्षांचा अनुभव | अर्जदारांनी वरील अ. क्र. 1 मध्ये विहित केलेला स्थावर मालमत्ता मूल्यांकनामधील सहा महिन्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.<br><br>**टीप: वरील अ. क्र. 2 मध्ये निर्देशित केलेल्या निकषांच्या आधारे यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले अर्जदार दि. 1.1.2020 नंतरदेखील यादीमध्ये समाविष्ट करण्यास पात्र ठरतील.** |
| 03. | भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची, स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामधील पदव्युत्तर पदवी | परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर स्थावर मालमत्ता मूल्यांकनाच्या क्षेत्रामध्ये 2 वर्षांचा अनुभव | |

**III. शेतजमिनीचे मूल्यांकक**

**शेतजमिनीच्या मूल्यांककांच्या यादीमध्ये समाविष्ट होण्याकरता आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव:**

शेतजमिनीचे मूल्यांकन करण्याच्या व्यवसायाचे नियमन करणारा कुठलाही कायदा अस्तित्त्वात नाही.

आपल्या देशामध्ये शेतजमिनीच्या मूल्यांकनासाठी पात्र ठरण्याकरता कुठलाही शिक्षणक्रम अस्तित्त्वात नाही. मात्र, शेतजमिनीच्या मूल्यांककाला मूल्यांकनाच्या खालील तत्त्वांचे ज्ञान असणे आवश्यक आहे -

- किंमत, मूल्य आणि मोल
- मूल्याचे विविध प्रकार
- मूल्यातील घटक, भाग, वैशिष्ट्ये
- वर्षासन - भांडवलीकरण - भांडवलीकरणाचा दर - भांडवलाची सोडवणूक
- मूल्यांकनाचे तीन मार्ग - उत्पन्न, बाजारपेठ आणि किंमत
- शेतजमिनीला लागू असलेले कायदे

यासंबंधी शिक्षणक्रम उपलब्ध होईपर्यंत यादी संपादन संपत्ती कर नियम 8अ (3) मध्ये घालून दिलेल्या निकषांप्रमाणे करता येऊ शकेल. सदर नियम खालीलप्रमाणे आहे -:

**नियम 8अ (3)** शेतजमिनीच्या (उपनियम (4) मध्ये संदर्भित असलेल्या मळ्यांव्यतिरिक्त) मूल्यांककांजवळ खालीलप्रमाणे अर्हता असणे आवश्यक आहे :-

i. ते एखाद्या मान्यताप्राप्त विद्यापीठाचा शेतकी विज्ञानातील पदवीधर असणे आवश्यक आहे आणि त्यांनी शेतजमीन मूल्यांकक म्हणून किमान पाच वर्षे काम केलेले असणे आवश्यक आहे; आणि

ii. पूर्वी त्यांनी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तडजोड अधिकारी, जमीन मूल्यांकन अधिकारी, जमीन अभिलेख खात्याचा अधीक्षक, शेतकी अधिकारी, नोंदणी अधिनियम, 1908 (1908 चा 16) खालील नोंदणी अधिकारी किंवा समस्तरीय असलेला तत्सम कार्ये करणारे कुठलेही अधिकारी म्हणून शासनामध्ये काम केलेले असणे आवश्यक आहे आणि वरीलपैकी कुठल्याही एक वा अधिक पदांवर एकूण किमान पाच वर्षे काम केल्यानंतर सेवानिवृत्त झालेले असावेत किंवा त्यांनी पदाचा राजीनामा दिलेला असावा.

**IV. संपत्ती कर नियम 8अ (4) अंतर्गत शेतजमीन मूल्यांकक (मळे)**
**यादीमध्ये समाविष्ट करण्याकरता आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव**

कॉफी, चहा, रबर किंवा विलायची मळ्यांच्या मूल्यांककांकडे खालीलप्रमाणे पात्रता असेल:--

(i) त्यांनी किमान पाच वर्षांच्या कालावधीकरता कॉफी, चहा, रबर किंवा विलायचीच्या लागवडीखालील किमान चार हेक्टर किंवा अन्य पदार्थांच्या बाबतीत चाळीस हेक्टर क्षेत्र असलेल्या मळ्याची मालकी किंवा व्यवस्थापन केलेले असणे आवश्यक आहे; किंवा
(ii) पूर्वी त्यांनी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तडजोड अधिकारी, जमीन मूल्यांकन अधिकारी, जमीन अभिलेख खात्याचा अधीक्षक, शेतकी अधिकारी, नोंदणी अधिनियम, 1908 (1908 चा 16) खालील नोंदणी अधिकारी किंवा समस्तरीय असलेला तत्सम कार्ये करणारे कुठलेही अधिकारी म्हणून शासनामध्ये काम केलेले असणे आवश्यक आहे आणि वरीलपैकी कुठल्याही एक वा अधिक पदांवर एकूण किमान पाच वर्षे काम केल्यानंतर सेवानिवृत्त झालेले असावेत किंवा त्यांनी पदाचा राजीनामा दिलेला असावा आणि त्यापैकी किमान तीन वर्षे अशा भागातला अनुभवा असावा जिथे कॉफी, चहा, रबर किंवा विलायचीची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते.

**V. मालाचे साठे आणि समभागांचे मूल्यांकक**

सदर मालमत्तांच्या बाबतीत संपत्ती कर नियम 8अ (7) मध्ये निर्देशित केलेले निकष स्वीकारले जातील.

**नियम 8अ (7)** मालाचे साठे, समभाग, डिबेंचर्स, रोखे, भागीदारी कंपन्यातील समभाग यांचे गुडविल सह, पण उपनियम (2) ते (6) आणि (8) ते (11) मध्ये नमूद केलेल्या गोष्टी वगळून, मूल्यांकन करणाऱ्या मूल्यांककांकडे खालीलप्रमाणे अर्हता असणे आवश्यक आहे -

i. ते इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट्स ऑफ इंडिया किंवा इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंट्स ऑफ इंडिया [किंवा इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज् ऑफ इंडिया] चे सदस्य असणे आवश्यक आहे; आणि

ii. त्यांनी सनदी लेखापाल किंवा कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंटंट किंवा कंपनी सेक्रेटरी म्हणून किमान दहा वर्षे काम केलेले असावे आणि या व्यवसायातून त्यांना मागील पाचपैकी कुठल्याही तीन वर्षांमध्ये किमान पन्नास हजार रूपये ढोबळ उत्पन्न मिळालेले असावे.

पूर्वानुभवाचा पुरावा बँका/वित्तीय संस्थांना सादर करणे आवश्यक आहे. मूल्यांकनाचे काम स्वीकारणाऱ्या कंपनी/भागीदारी फर्म यांच्या बाबतीत, अर्हता आणि अनुभवाचे निकष कंपनीचे मुख्य मूल्यांकक आणि भागीदारी संस्थेचे सर्व भागीदार यांना लागू होतील.

**B) किमान वयाची अट:-**

किमान वय 25 वर्षे असणे आवश्यक आहे आणि कमाल वयाची कुठलीही अट नाही.

**C) व्यावसायिक मंडळांचे सदस्यत्व**

मूल्यांककाने विविध व्यावसायिक मंडळांच्या व्यावसायिक उपक्रमांमध्ये सक्रीयपणे सहभाग घेणे आवश्यक आहे. भारतातील बँका/वित्तीय संस्थांनी यादीमध्ये समाविष्ट केलेला प्रत्येक मूल्यांकक खाली नमूद केलेल्यांपैकी कुठल्याही एक संघटना/संस्थांचा एक सन्माननीय सदस्य असणे आवश्यक आहे:

**इन्स्टिट्युशन ऑफ व्हॅल्युअर्स (आयओव्ही)**
**इन्स्टिट्युशन ऑफ सर्व्हेयर्स (मूल्यांकन शाखा) (आयओएस)**
**इन्स्टिट्युशन ऑफ गव्हर्मनेंट अप्रुव्हड व्हॅल्युअर्स (आयजीएव्ही)**
**प्रॅक्टिसिंग व्हॅल्युअर्स असोशिएशन ऑफ इंडिया (पीव्हीएआय)**
**इंडियन इन्स्टिट्युशन ऑफ व्हॅल्युअर्स (आयआयव्ही)**
**इन्स्टिट्युशन ऑफ इस्टेट मॅनेजर्स अँड अप्रेजर्स (आय-एस्मा)**
**सेन्टर फॉर व्हॅल्युएशन स्टडीज, रिसर्च अँड ट्रेनिंग (सीव्हीएसआरटी)**
**रॉयल इन्स्टिट्युशन ऑफ चार्टर्ड सर्व्हेयर्स, इंडिया चॅप्टर (आरआयसीएस)**
**अमेरिकन सोसायटी ऑफ अप्रेजर्स (एएसए), यूएसए**
**अप्रेजल इन्स्टिट्यूट (एआय), यूएसए**

**D) मूल्यांककांचे वर्गीकरण**

मूल्यांककांना खालील वर्गीकरणानुसार यादीमध्ये समाविष्ट केले जाईल :

| अ. क्र. | मूल्यांककांचा वर्ग | मूल्यांकनामधील अनुभव | मूल्यांकनाचे काम देण्याच्या मालमत्तेचे मूल्य |
|---|---|---|---|
| 1. | अ | 10 वर्षांपेक्षा अधिक | कुठलीही मर्यादा नाही |
| 2. | ब | 5 वर्षे ते 10 वर्षे | रू. 50 कोटीपर्यंत |
| 3. | क | 5 वर्षांपेक्षा कमी | रू. 5 कोटीपर्यंत |

मूल्यांककांनी अनुभवाचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. सदर पुराव्यादाखल खालीलपैकी कुठली एक कागदपत्र स्वीकारले जाईल :

1. कुठल्याही बँक/वित्तीय संस्थेचे, यादीमध्ये समावेश केल्याचे (एम्पॅनलमेंट) पत्र
2. कुठल्याही भारतीय न्यायालयाचे, यादीमध्ये समावेश केल्याचे (एम्पॅनलमेंट) पत्र
3. संपत्ती कर अधिनियम, 1957 खालील नोंदणी प्रमाणपत्र
4. भारत सरकार/कुठलेही राज्य सरकार/कुठलीही नगरपालिका/कुठलीही महानगरपालिका यांचे मूल्यांकन सल्लागार म्हणून नेमणुकीचे पत्र
5. भारत सरकार/कुठलेही राज्य सरकार/कुठलीही नगरपालिका/कुठलीही महानगरपालिका यांचे मूल्यांकन कर्मचारी म्हणून नेमणुकीचे पत्र
6. मूल्यांकन व्यवसायामध्ये कार्यरत असलेल्या कुठल्याही मर्यादित कंपनीचे मूल्यांकन कर्मचारी म्हणून नेमणुकीचे पत्र
7. कुठल्याही मर्यादित कंपनीचे मूल्यांकन सल्लागार म्हणून नेमणुकीचे पत्र
8. गेल्या पाच वर्षांपासून मूल्यांकन व्यवसायामध्ये कार्यरत असलेल्या कुठल्याही भागीदारी/एकमालक/प्रायव्हेट लिमिटे कंपनीचे मूल्यांकन कर्मचारी म्हणून नेमणुकीचे पत्र

**E) शासनाकडील नोंदणी**

केंद्र/राज्य सरकारकडे नोंदणीकृत असल्या उत्तम, पण ते अनिवार्य नाही. मात्र कृपया याची नोंद घ्यावी की, एसएआरएफएइएसआय कायद्यांतर्गत मूल्यांकनाच्या बाबतीत, संपत्ती कर अधिनियम (कलम 34 अअ ते 34 अइ) खाली नोंदणीकृत मूल्यांककाकडूनच मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे. मूल्यांककांना काम देताना/कंत्राट देताना, बँकांनी एसएआरएफएइएसआय कायद्यांतर्गत तरतुदी विचारात घेऊन त्यांचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

**F) शिफारस**

मूल्यांककाची योग्यता व क्षमता तपासून पाहण्याकरता त्याने पूर्वी काम केलेल्या ठिकाणचे संदर्भ तपासून पाहणे अतिशय महत्त्वाचे असते. मूल्यांककांनी किमान 3 शिफारसपत्रे सादर करणे आवश्यक आहे आणि मूल्यांककाचे नाव आपल्या यादीत समाविष्ट करण्यापूर्वी, त्याने पूर्वी केलेल्या कामाचा दर्जा बँकांनी पडताळून पाहणे आवश्यक आहे. सदर शिफारसपत्रे एक तर (i) मूल्यांककाने पूर्वी काम केलेल्या बँकांचे व्यवस्थापक किंवा (ii) ज्यांच्याकरता त्याने पूर्वी मूल्यांकनाचे काम केले आहे अशा कंपन्यांकडून प्राप्त झालेली असावीत. शिफारसपत्र बँक/वित्तीय संस्था/मूल्यांककाने पूर्वी काम केलेली कुठलीही कंपनी यांच्या लेटरहेडवर असणे आणि त्यावर वरिष्ठ पातळीवरील व्यवस्थापक/अधिकारी यांची रीतसर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

**G) अन्य अटी**

वरील व्यतिरिक्त, यादीमध्ये नाव समाविष्ट करतेवेळी मूल्यांककांनी सोबत जोडलेल्या नमुन्यांप्रमाणे एक प्रतिज्ञापत्र, आचारसंहिता आणि मूल्यांकक म्हणून यादीत नाव समाविष्ट करण्यासाठीचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे.